# न भुतो न भविष्यति... मराठ्यांचा जनसागर मुंबईत

शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### आंदोलकांना अन्न, पाणी, स्वच्छतागृहांची सुविधा न देण्याचा ठपका

## हे सरकार इंग्रजांपेक्षा वाईट - मनोज जरांगे पाटील

**मुंबई -** आझाद मैदानात सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. आंदोलकांना अन्न, पाणी, स्वच्छतागृहे यांसारख्या मूलभूत सुविधा न देण्याचा ठपका त्यांनी सरकारवर ठेवला असून, हे सरकार इंग्रजांपेक्षा वाईट आहे, असा घणाघात त्यांनी केला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत मराठा आंदोलनाचा पहिला दिवस पार पडला. 'एक मराठा लाख मराठा' म्हणत लाखो मराठा बांधवांनी मुंबईत धडक दिली. मनोज जरांगे यांनी सांगितल्याप्रमाणे मराठा बांधव कालपासूनच मुंबईच्या वेशीवर दाखल झाले होते. सरकारने आरक्षण दिल्याशिवाय माघार घेणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. वाशीच्या एपीएमसी मार्केटमध्ये रात्रीची दृष्ये दिसली, तर काही आंदोलकांची राहण्याची सोय नवी मुंबईतील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये करण्यात आली होती. सकाळी वाशी टोल नाक्यावर वाहनांची गर्दी दिसली आणि आनंदनगर परिसरात सकल मराठा समाजातर्फे खाण्यापिण्याची सोय करण्यात आली. कर्नाटक ब्रिज चौकातून मोठ्या संख्येने आंदोलक आझाद मैदानाकडे रवाना झाले. आझाद मैदानात पावसाने चिखल झाला असला तरी आंदोलकांचा उत्साह कायम होता. मुंबईकरांनीही आंदोलकांना जेवणाचे डबे देऊन माणुसकीचा धर्म पाळला. मानखुर्द, चेंबूर मार्ग आणि फ्रीवेवर मराठा बांधवांचा ताफा दिसल्याने मुंबईत वाहतूक कोंडी झाली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरातही आंदोलकांची गर्दी होती. मुंबईत लोकलमध्ये, रस्त्यांवर, जागोजागी केवळ मराठा आंदोलकांची उपस्थिती दिसून येत होती. आंदोलकांनी जोपर्यंत सरकार आम्हाला आरक्षण देत नाहीत, तोपर्यंत आम्ही हरणार नाहीत असा ठाम निर्धार व्यक्त केला. न भुतो न भविष्यति असा जनसागर मुंबईत दिसून आला.

मनोज जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आंदोलनाला दडपण्यासाठी सरकारने मुंबईतील खाऊ गल्ली, हॉटेल्स बंद केली. पाण्याचीही कुठलीच सोय केली नाही.

आंदोलनकर्त्यांना चहा, जेवण, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे मिळू नयेत यासाठी प्रशासनाकडून जाणूनबुजून अडथळे निर्माण केले गेले. त्यांनी पुढे स्पष्ट केले, आम्ही सरकारच्या नियमांचे पालन करत आहोत. शांततेत आंदोलन करत आहोत. पण जर सरकारने आडमुठेपणा केला, तर आम्हीही आता माघार घेणार नाही.

जरांगे पाटील यांनी संतप्त होत म्हटलं, हे सरकार इंग्रजांपेक्षा वाईट आहे. आम्ही माज-मस्ती घेऊन आलेलो नाही, तर वेदना घेऊन आलो आहोत. मराठ्याच्या मुलांना वाईट वागणूक दिली जात आहे.




हे सरकार केवळ बाहेरून सहानुभूती दाखवतं, पण प्रत्यक्षात तीव्र अन्याय करतं.

जरांगे यांनी मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण करण्याचा आरोपही थेट सरकारवर केला. ते म्हणाले, आम्ही कुणाच्या आरक्षणावर डोळा ठेवलेला नाही. आमचं अस्तित्व पुराव्यांसकट सिद्ध आहे. १५० वर्षांपूर्वीच्या नोंदी आहेत - हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटमध्ये आमच्या समाजाचा उल्लेख आहे. तरी सरकार आमच्याच हक्काचं इतरांना वाटतंय. हेच सरकार समाजांमध्ये भांडण लावण्याचं काम करतंय.

ही लढाई आता आरपारची आहे, असं ठामपणे सांगत जरांगे यांनी म्हटलं की, सरकारने जर आरक्षण दिलं तर मराठ्याचं मूल त्यांना आयुष्यभर विसरणार नाही. पण जर दिलं नाही, तर मी उपोषण करून मरणार - पण मागे हटणार नाही. तसंच, त्यांनी स्पष्ट केलं की, फक्त आरक्षणाची घोषणा नाही, तर अंमलबजावणी झाली पाहिजे. तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.

जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवरही तीव्र शब्दात टीका केली. त्यांनी विचारलं, फडणवीसांचं कर्तृत्व काय? धनगरांना फसवलं, कैकाडी समाज तीन वर्गांमध्ये विभागला, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या - हे त्यांचं यश आहे का? तसंच, अंतरवाली सराटीतील आंदोलनादरम्यान पान २ वर

युवा आदर्श

### इव्हेंट ...

नेहमी चाले उत्सव
कसे सर्वत्र वरचेवर
इव्हेंट मॅनेजमेंट ते
गाजे शहर गावभर
मोठ मोठाले मंडप
रे पहुंडले रस्त्यावर
रस्ते झाले खड्डेमय
केले खड्डे खोलवर
वीज कनेक्शन घ्या
कुठल्याही पोल वर
कुणा आहे दहशत
असले पोलखोलवर
डीजेला घाला शपथ
आवाज वाढे ढोलवर
डेसिबल चिंता नाही
ओळखी असे दूरवर
ठेका धरतात पुढारी
अति उत्साह अनावर
नशेत कुणी झिंगतात
अंकुश कुठले मनावर
उधळण हार फुलांची
रे गुलाल जेसीबी भर
मने सगळी कुजलेली
सुटली दुर्गंधी गावभर
सामान्यांचे निधी खर्च
प्रस्थ वाढतेयं भराभर
समस्या मात्र तशाचं
उभ्या प्रतिक्षे भारंभर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## सोलर केबल ची चोरी करणारे तीन आरोपींना परतूर पोलिसांनी केली अटक



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर भागात सोलर प्लांट वर होणाऱ्या चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी माननीय पोलीस अधीक्षक, अजयकुमार बंसल यांनी आदेश करून सूचना केल्या होत्या.

त्यावरून दि.२७/०८/२०२५ रोजी पोलीस ठाणे परतूरचे पोलीस निरीक्षक, एस.बी. भागवत यांना माहिती मिळाली की, मोजे खांडवी तालुका परतुर येथे सोलर प्लांट वरील चोरी ही आरोपी नावे समीर काळे याने त्याच्या साथीदारासह केली आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली होती.

पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांनी संशयित आरोपी नामे समीर काळे यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने सदर चोरी त्याचे साथीदार नामे सय्यद असेफ व शेख गौस यांच्यासह केल्याची कबुली दिली.

त्यांच्याकडे इतर होण्याबाबत चौकशी केली असता त्यांनी इतर तीन गुन्हे मोजे मसला येथील टाटा सोलार येथे केल्याचे कबुली केली आहे.

सदर तिन्ही आरोपींना अटक करून त्यांच्याकडून पान २ वर

## जालनेकरांना बुद्धीचे बळ दाखविण्याची संधी

### जालना गणेश फेस्टिव्हलतर्फे बुद्धीबळ स्पर्धा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात रविवार दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी बुद्धिबळ प्रेमींसाठी मोठा सोहळा रंगणार आहे. जालना गणेश फेस्टिव्हलच्या वतीने कल्याणराव घोगरे क्रीडा संकुल, जुना जालना येथे खुली गट तसेच १५ वर्षाखालील व १० वर्षाखालील गटांत बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजेत्या खेळाडूंना आकर्षक रोख पारितोषिके व ट्रॉफी देण्यात येणार असून, सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.
स्पर्धेतील पारितोषिके खुला गट : प्रथम - रु २१०१, द्वितीय - रु १५०१, तृतीय - रु १००१, १५ वर्षाखालील गट : प्रथम - रु १५०१, द्वितीय - रु १००१, तृतीय - रु ७०१, १० वर्षाखालील गट : प्रथम - रु १००१, द्वितीय - रु ७०१, तृतीय - रु ५०१
स्पर्धेसाठी आवश्यक अटी : स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंनी स्वतःचा बुद्धिबळपट सोबत आणणे बंधनकारक आहे. तसेच १५ व १० वर्षाखालील गटातील खेळाडूंनी आपला नगर परिषदेचा जन्म दाखला सोबत ठेवणे आवश्यक आहे.

**संयोजन समितीचे आवाहन**

या बुद्धिबळ महोत्सवात जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जालना गणेश फेस्टिव्हलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, अध्यक्ष अशोकराव आगलावे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब घुगे तसेच मुख्य पंच श्री. सतीश ठाकूर व पंच श्री. कृष्णा ठाकूर यांनी केले आहे.

नावनोंदणीसाठी सतीश ठाकूर ९९६०६४०६०२ / ७६२०८५७६६४ या नंबर वर संपर्क करून नोंदणी करावी. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील लहानग्या खेळाडूंना आपले बुद्धिबळ कौशल्य सादर करण्याची मोठी संधी मिळणार आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला बँकर्स बैठकीत विविध शासकीय योजनांच्या प्रगतीचा आढावा

**जालना । प्रतिनिधी -** बँकांनी मुख्यमंत्री रोजगार हमी कार्यक्रम ांतर्गत सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. आजपर्यंत केवळ ६० प्रकरणांना मंजुरी मिळाली असून लक्ष्य १५०० आहे. तरी प्रत्येक शाखेने किमान दोन प्रकरणे शोधून त्यांना मंजुरी द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जालना जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बँकर्स बैठकीत विविध शासकीय योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्ह्यातील सर्व बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, पीएम एफएमई (PMFME) व एआयएफ (IF) अंतर्गत जालना जिल्ह्याची कामगिरी समाधानकारक असली तरी चालू वर्षी मंजुरी फक्त ३६ प्रकरणांची झाली आहे. तर १३८ प्रकरणे प्रलंबित असून बँकांनी ती प्राधान्याने निकाली काढावी. पीएम विश्वकर्मा या केंद्र शासनाच्या सर्वसमावेशक योजनेची माहिती बँकांना देण्यात आली. या योजनेत १८ पारंपरिक व्यवसायांचा समावेश असून त्याचा जास्तीत जास्त लाभ जिल्ह्यातील लाभार्थ्यांना मिळावा यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

जिल्ह्यातील प्राथमिकता क्षेत्र कर्जपुरवठा व एमएसएमई कर्जपुरवठा यामध्ये बँकांनी चांगली कामगिरी केली असून जून २०२५ अखेर पहिल्या तिमाहीत ५०% प्रगती साधली आहे.

पिककर्ज वितरण बाबतीत आतापर्यंत ४३% इतकी (५७५ कोटी) प्रगती झाली आहे, तर वार्षिक लक्ष्य १३२० कोटी आहे. शेतकऱ्यांच्या कमी प्रमाणात नूतनीकरणामुळे ही प्रगती अपेक्षेप्रमाणे नाही, असे निदर्शनास आले. जिल्ह्यातील ३.३१ लाख शेतकऱ्यांना एकूण ३३९६ कोटींचे पिककर्ज वितरित झाले आहे. मात्र २.६१ लाख शेतकऱ्यांचे सुमारे २५०० कोटी (७३%) थकबाकीचे आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY) अंतर्गत जिल्ह्यातील २,४०,००० पात्र शेतकरी पान २ वर



# संपादकीय

## बोगस डॉक्टरांचा कारभार; आरोग्य व्यवस्थेवरील घाव

आरोग्यसेवा ही प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. पण, जिल्ह्यात वाढत चाललेली बोगस डॉक्टरांची संख्या आणि त्यांच्यावर होत असलेली कारवाईची कमतरता ही संपूर्ण आरोग्यव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. जिल्हा वैद्यकीय अधिकारी (ऊव्रज) आणि आरोग्य विभाग यांची जबाबदारी कायद्याने स्पष्ट केलेली असताना त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे वास्तव आता उघडकीस आले आहे. बॉम्बे नर्सिंग क्ट, आयएचआयपी आणि डब्ल्यूएचएमआयएस सारख्या कायद्यांतर्गत प्रत्येक डॉक्टराने नोंदणी करणे बंधनकारक आहे. पण, परतूर, जालना, बदनापूर, घनसावंगीसारख्या भागांतील आकडेवारी पाहता शेकडो डॉक्टरांपैकी केवळ काही मोजक्या डॉक्टरांनीच नोंदणी केली आहे. बाकीच्यांनी नियमांची सरळ पायमल्ली केली आहे. हा प्रकार केवळ कायद्याचा भंग नाही तर रुग्णांच्या आरोग्याशी खेळ करणारा गंभीर गुन्हा आहे.

**जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांची निष्क्रियता**

आरोग्य विभागाचे अधिकारी तपासणीसाठी भेट देत नसल्याने या बोगस डॉक्टरांचा धंदा दिवसेंदिवस वाढतो आहे. नोंदणी न करणाऱ्या डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याचा अधिकार असतानाही ऊव्रज कार्यालय कारवाईकडे दुर्लक्ष करते. हे दुर्लक्ष केवळ अधिकारातील शिथिलता दाखवत नाही, तर त्यामागे राजकीय हस्तक्षेप, स्थानिक दबाव किंवा भ्रष्टाचाराचे सावट असल्याची चर्चा जनतेत आहे. अनेक हॉस्पिटल्समध्ये उपचार करणारे तथाकथित डॉक्टर हे आपल्या मूळ शाखेऐवजी इतर शाखेची प्रॅक्टीस करत आहेत. उदाहरणार्थ, आयुर्वेद किंवा होमिओपॅथी शिकलेले काही डॉक्टर अलोपॅथीची प्रॅक्टीस करतात. त्यामुळे चुकीच्या उपचारांमुळे रुग्णांचे नुकसान होते, आणि कधी कधी मृत्यूचीही उदाहरणे घडतात. जिल्ह्यातील सर्व हॉस्पिटल्सची यादी तयार करून तातडीने तपासणी मोहीम हाती घेणे. परवानाधारक नसलेल्या डॉक्टरांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे. ग्रामीण व शहरी भागात जागरूकता मोहीम राबवून नागरिकांना अधिकृत डॉक्टर ओळखण्याचे मार्गदर्शन करणे. जिल्हा वैद्यकीय अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करून निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करणे. आरोग्यसेवेत पारदर्शकता, जबाबदारी आणि सुरक्षितता वाढवणे ही काळाची गरज आहे. शासनाने केवळ नियम तयार करून न थांबता त्यांच्या अंमलबजावणीकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे. अन्यथा बोगस डॉक्टरांचा कारभार वाढतच जाईल, आणि त्याची किंमत शेवटी सामान्य जनतेलाच मोजावी लागेल.

# आदर्श शिक्षक शेख अब्दुल रहीम; विद्यार्थी व शिक्षकांच्या हक्कासाठी लढा देणारे एक प्रेरणादायी, बहुआयामी व्यक्तिमत्व

शिक्षण आणि सामाजिक कार्याच्या क्षेत्रात काही व्यक्ती अशा असतात की ज्या आपल्या परिश्रम, त्याग आणि चिकाटीमुळे केवळ स्वतःचे जीवन घडवतात असे नाही, तर इतरांसाठीही आशा व प्रेरणेचा मार्ग निर्माण करतात. अशा तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी असलेले शेख अब्दुल रहीम हे एक उल्लेखनीय नाव आहे.

त्यांचा जन्म छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील एका सुस्थित, परंतु परिश्रमी घराण्यात झाला. त्यांचे वडील शेख बाबू शेख अय्यूब (माजी नगरसेवक) हे लोकाभिमुख, उदार व समाजसेवी व्यक्तिमत्त्व आहे. आई श्रीमती आबिदा बी या सुसंस्कारित, सोज्वळ आणि धार्मिक वृत्तीच्या असून मुलांच्या संगोपनात त्यांनी कोणतीही कसूर ठेवलेली नाही. घरात नेहमीच धार्मिक मूल्यांचा व समाजसेवेचा वारसा जपला गेला, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला संतुलित, उद्देशपूर्ण आणि सकारात्मक दिशा मिळाली. ते नेहमी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांच्या शिक्षणप्रेरणेला आणि आशिर्वादाला देतात.

**शैक्षणिक प्रवास**

शेख अब्दुल रहीम यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नॅशनल उर्दू प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा, सिल्लोड येथे पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी मौलाना मोहम्मद अली जोहर उर्दू ज्युनिअर सायन्स कॉलेज, सिल्लोड येथे उच्च माध्यमिक शिक्षण घेतले आणि उत्कृष्ट यश संपादन केले.

यानंतर यशवंतराव चव्हाण कॉलेज, सिल्लोड येथून बी.एस्सी. पदवी प्राप्त केली. मात्र त्यांचे ध्येय केवळ पदवी संपादन करणे एवढेच नव्हते; तर शिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी करून समुदायाच्या प्रगतीसाठी वाट मोकळी करणे हा त्यांचा उद्देश होता. त्यानुसार त्यांनी शिक्षक व्यवसायात प्रवेश केला. पुढे मौलाना मोहम्मद अली जोहर उर्दू डी.एड कॉलेज, सिल्लोड येथून डी.एड पूर्ण करून अध्यापन क्षेत्रात सक्रिय झाले. शालेय जीवनातच परिश्रमशील व मार्गदर्शक वृत्तीमुळे त्यांनी शिक्षक व सहाध्यायांचा विश्वास संपादन केला .

**विद्यार्थीदशेतील संघर्ष**

विद्यार्थी जीवनापासूनच ते सहाध्यायांच्या हक्कांसाठी झटत राहिले. बहुतेक तरुण केवळ स्वतः पुरते मर्यादित राहतात; परंतु त्यांनी शिष्यवृत्ती, शालेय सुविधा व विविध उपक्रमांच्या प्रसारासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे सहाध्यायांमध्ये त्यांची प्रतिमा सहृदय, हृदयजिंकणारी आणि नेतृत्वगुणांनी परिपूर्ण अशी निर्माण झाली. त्या काळातच त्यांच्या संघटनकौशल्याचा प्रत्यय आला. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासातच नव्हे, तर सांस्कृतिक, क्रिडा व सामाजिक उपक्रमांमध्येही पुढे जाण्यास प्रोत्साहित केले. हाच भाव त्यांच्या भावी समाजकार्याचा भक्कम पाया ठरला.

**अध्यापक जीवनाची सुरुवात**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शेख अब्दुल रहीम यांनी शिक्षक म्हणून कार्यारंभ केला. त्यांच्यासाठी शिक्षक ही केवळ नोकरी नव्हे, तर एक ध्येयपूर्ती आहे. अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या नैतिक व सामाजिक जडणघडणीकडे लक्ष देणे हे त्यांनी आपले प्रमुख कर्तव्य मानले. त्यांच्या मते शिक्षक हा फक्त पुस्तकातील ज्ञान देणारा नसून, जीवन जगण्यासाठी योग्य दिशा दाखवणारा मार्गदर्शक असतो.

वर्गात ते सदैव मार्गदर्शक, सल्लागार व मित्र म्हणून विद्यार्थ्यांच्या सोबत असतात. त्यांच्या अडचणी संयमानं ऐकून योग्य मार्गदर्शन करणे आणि प्रोत्साहन देणे ही त्यांची नैसर्गिक वृत्ती आहे. आपल्या अध्यापनात त्यांनी आधुनिक अध्यापन पद्धतींचा अवलंब करून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्सुकता व जिज्ञासा निर्माण केली.

**विद्यार्थी व शिक्षकांसाठी सेवा**

अध्यापन क्षेत्रात आल्यानंतर त्यांनी ठरवले की आपले कार्य फक्त वर्गापुरते मर्यादित ठेवायचे नाही तर त्यांनी विविध कार्यशाळा, सेमिनार आणि प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि मोफत शैक्षणिक मदत उपलब्ध करून दिली. तसेच शिक्षकांसाठी आधुनिक अध्यापन तंत्रज्ञान व पद्धती यावर प्रशिक्षण सत्रे घेतली.



**महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारीजी सोबत चर्चा करतांना शेख अब्दुल रहीम!** **संग्रहीत छायाचित्र**

त्यांच्या मते शिक्षक-विद्यार्थी संबंध परस्पर विश्वास व आपुलकीवर आधारित असले पाहिजेत. शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी त्यांनी दिलेल्या अनेक सूचनांची यशस्वी अंमलबजावणी शाळांमध्ये झाली आहे.

**हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन - सेवेचे उज्ज्वल पान**

मौलाना अबुल कलाम आझाद यांचे एक सुविचार आहे की, जर तुम्ही फक्त स्वतःसाठी जगत असाल, तर त्याचा अर्थ तुम्ही आपल्या समाजासाठी एक जिवंत प्रेत आहात.

याचीच प्रेरणा घेत त्यांनी समाजासाठी आपल्या कार्याची सुरुवात केली.

त्यांच्या समाजकार्याला संघटित स्वरूप हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन या संस्थेमार्फत मिळाले. या संस्थेमार्फत गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके, बॅग्ज, गणवेश आणि इतर शैक्षणिक साधने पुरवली जातात. आरोग्य क्षेत्रात मोफत वैद्यकीय शिबिरे, रक्तदान शिबिरे आणि जनजागृती मोहिमा यशस्वीरित्या राबवल्या जातात.

या संस्थेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे मदतीपुरतेच न थांबता, गरजू लोकांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे या संस्थेची ओळख सिल्लोड, छत्रपती संभाजीनगरपुरती मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. अनेक निराधार कुटुंबांना आधार मिळाला असून, शेकडो विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली आहे.

**विशेष ध्येये व यशस्वी प्रयत्न**

त्यांचे एक महत्त्वाचे स्वप्न म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला शंभर टक्के अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचा पुरवठा व्हावा. त्यासाठी त्यांनी स्वतःच्या प्रयत्नांनी गरजू विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके व शैक्षणिक साधने उपलब्ध करून दिली.

शेख अब्दुल रहीम यांना सततच्या प्रयत्नांमुळे अनेक उल्लेखनीय कार्यात यश मिळाले आहे. विशेषतः मुस्लिम मुलींना बुरखा परिधान करून बोर्ड परीक्षेला बसण्याची परवानगी मिळवून देण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. हे यश केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरले. याशिवाय अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.

**वैयक्तिक गुणवैशिष्ट्ये**

शेख अब्दुल रहीम यांचे व्यक्तिमत्त्व प्रामाणिकपणा, नम्रता, संयम आणि चिकाटी या चार गुणांचे सुंदर मिश्रण आहे. कठीण प्रसंगातही धैर्य न सोडणे आणि इतरांच्या सोयीसाठी निस्वार्थीपणे कार्य करणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. सौम्य वागणूक, विनम्र बोलणे आणि आपुलकीचा स्वभाव यामुळे प्रत्येकजण त्यांच्याशी सहज जवळीक अनुभवतो. ते इतरांच्या यशात मनापासून आनंद व्यक्त करतात व त्यांना नेहमी प्रोत्साहित करतात.

त्यांच्या कार्यातील निष्ठा आणि सामाजिक तसेच शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण व यशस्वी प्रयत्नांमुळे त्यांना राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय असे अनेक पुरस्कार मान्यवर व्यक्ती आणि अधिकाऱ्यांच्या हस्ते प्राप्त झाले आहेत.

**भविष्याची ध्येये**

त्यांची इच्छा आहे की हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन ही महाराष्ट्रात शैक्षणिक व सामाजिक परिवर्तन घडवणारी आदर्श संस्था म्हणून उभी राहावी. ते शिक्षकांसाठी आधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विचारात आहेत, ज्यायोगे नवी पिढी काळाच्या गरजेनुसार सक्षम व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकेल.

त्यांचे स्वप्न आहे की प्रत्येक मुलाला उत्तम शिक्षणासोबत उत्तम चारित्र्य निर्मितीचे धडेही मिळावेत, ज्यामुळे शिक्षण ही एक सामाजिक चळवळ बनून अज्ञान आणि मागासलेपणा दूर होईल.

**निष्कर्ष व संदेश**

शेख अब्दुल रहीम यांच्या कार्यातून शिकवण मिळते की उच्च ध्येय आणि नीयत शुद्ध असेल, तर मर्यादित साधनेही यशाची पायरी ठरतात. त्यांचा संदेश स्पष्ट आहे - शिक्षण हा प्रकाशकिरण आहे आणि हा प्रकाश समाजातील प्रत्येकाच्या जीवनात पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.

**मोहम्मद असलम परवेज़**
**न.प. उर्दू उच्च प्राथमिक शाळा,**
**लोणार - बुलढाणा**
**मो.९९२२८९७४७५**

# ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** ग्राम पातळीवर महसूली कामे वेळच्या आत पुर्ण करुन त्यानुसार अभिलेखे अद्यावत करणे व तसेच ग्राम पातळीवर कार्यालयीन काम काजात सुलभता येण्यासाठी ग्राम पातळीवरील अधिकारी- कर्मचारी यांना प्रशिक्षीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या दैनंदिन कामकाजाची माहिती व्हावी यासाठी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्यासाठी दि. ३० ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी दिली.

प्रशिक्षणाचे दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० वाजता जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून सकाळी १० ते ११ या कालावधीत सर्वांसाठी घरे योजनेबाबत, जिवंत ७/१२ मोहिम, भोगवटादार वर्ग ०२ मधुन भोगवटादार वर्ग ०१ रुपांतरणाबाबत, शर्तभंग प्रकरणाबाबत उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, नायब तहसीलदार किशोर तायडे हे मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळी ११ ते ११:४५ या वेळेत अनुदान वाटप पध्दती, महसुली नकाशामध्ये दर्शविलेल्या सर्व पाणंद व शिवरस्त्यांचे मॅपींग करुन व रस्त्याच्या दुर्तफा वृक्ष लागवड करणे, ई-फेरफार, ई-चावडी आदी विषयावर उप विभागीय अधिकारी परतुर पद्माकर गायकवाड, सहायक महसूल अधिकारी भारती पांडे हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी १२ ते १ या वेळेत महाराजस्व अभियान राबविणे, ग्रिस्टॅक, (Digital Public Infrastructure for griculture) योजना अंमलबजावणी, कमी जास्त पत्रक, तुकडे बंदी कायदा, विशेष अर्थसहाय्य योजनेतंर्गत डीबीटीसाठी पात्र लाभार्थ्यांची योजनेनिहाय माहिती संकलित करणे याविषयी अंबडचे उप विभागीय अधिकारी उमाकांत पारधी, अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी १ ते २ या वेळेत वाळु/रेती निर्गती धोरण २०२५, वाळु घाटांचे सर्वेक्षण, एम-सॅण्ड, घरकुल बांधकाम वाळु वाटप, दगड, मुरुम, माती उत्खनन व सर्वेक्षण, अवैध उत्खनन, शासकीय कामांना गौण खनिज परवानगीबाबत या विषयांबाबत जालना उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, जिल्हा गौण खनिज अधिकारी तुषार निकम हे मार्गदर्शन करणार आहेत. तरी प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी वेळेवर उपस्थित रहावे. असेही सांगितले.

# सण, उत्सवात ध्वनीची मर्यादा राखून सूट दिल्याचे आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात सन २०२५ मध्ये विविध धार्मिक सण, उत्सव व उपक्रम संपन्न होणार असून या सण, उत्सवाच्या काळात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाचा वापर शासन निर्णय व ध्वनी प्रदुषण (नियम व नियंत्रण) नियम २०० च्या नियम ५ (३) नूसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाचा वापर श्रोतेगृहे, सभागृह, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागेशिवाय इतर ठिकाणी ध्वनीची विहीत मर्यादा राखून चालु वर्षातील खालील सण / उत्सव व उपक्रमाच्या दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्यात आली असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

सण, उत्सव व उपक्रमामध्ये शिवजयंती, ईद-ए-मिलाद, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, १ मे महाराष्ट्र दिन, श्रीकृष्ण जन्माष्टमी (दि. १५.०८.२०२५) अनुक्रमे एक दिवस तर गणपती उत्सवासाठी दि. २७ ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजीचे २ दिवस तसेच नवरात्री उत्सवातील नवमी आणि दिवाळीतील लक्ष्मीपूजन, ख्रिसमस, ३१ डिसेंबर रोजी, विभागीय महसूल क्रीडा स्पर्धा दि.१४ व १५ फेब्रुवारी रोजी आणि महत्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव दोन दिवस अशी सुट जाहीर करण्यात आली असल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

सण, उत्सवासाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापराबाबतची सुट जिल्ह्यातील शांतता क्षेत्रासाठी लागू नसून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित नगरपालिका, नगर पंचायत, स्थानिक संस्था व ध्वनी प्रदुषण प्राधिकरणाची राहील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**पान १ वरुन**

## हे सरकार ...

आई-बहिणींवर पोलिसी कारवाई करण्यात आली आणि गुन्हे दाखल करण्यात आले. जर त्या महिलांवर फडणवीसांनी अन्याय केला नसता, तर आम्हीही त्यांच्यावर बोललो नसतो, असं ते म्हणाले.

राज्यपाल कोट्यातून आमदारकी मिळवण्यासाठी काही मराठ्यांचा वापर होतोय, असा इशाराही त्यांनी दिला. त्यांनी नाव न घेता भाजप आमदार चित्रा वाघ यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. मराठ्यांवर बोलण्याआधी स्वतःचं कर्तृत्व पाहावं, असा टोला त्यांनी लगावला. मनोज जरांगे यांचे आरोप आणि भावना केवळ आंदोलनापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर ते सरकारच्या लोकशाही प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करतात. जर मूलभूत सुविधा नाकारल्या जात असतील, तर हा केवळ आंदोलकांचा नव्हे, तर लोकशाहीचा अपमान ठरतो. राज्य सरकारच्या वागणुकीमुळे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. सत्ताधारी पक्षासाठी ही एक राजकीय आणि सामाजिक कसोटीची वेळ आहे.

**मी तर संपणार नाहीतर आरक्षण तरी घेणार**

ही लढाई आता आरपारची आहे, मागे हटणार नाही. एकतर सरकारला आरक्षण द्यावं लागेल किंवा उपोषण करुन मी तरी मरणार, पण मागे हटणार नाही असं मनोज जरांगे म्हणाले. आता फक्त आरक्षणच नाही तर तर त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय मी आंदोलन मागे घेणार नाही असं मनोज जरांगे म्हणाले.

**विशेष अधिवेशनाची मागणी**

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनाला केवळ जनतेचा नव्हे, तर राजकीय प्रतिनिधींचाही पाठिंबा मिळत आहे. पंढरपूर-मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्र लिहून, मराठा समाजासाठी एक दिवसीय विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी केली आहे. आवताडे हे भाजपचे आमदार असून, ते महायुतीचा भाग आहेत. त्यामुळे त्यांच्या या पत्राला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

आमदार आवताडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, मनोज दादा जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रातून मराठा समाज पुन्हा एकदा एकवटला असून, गरजवंत मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही सर्वांची एकमुखी मागणी आहे. त्यामुळे सरकारने तत्काळ राज्य विधीमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे.

**आंदोलनस्थळी राजकीय नेत्यांची गर्दी**

आझाद मैदानावरील आंदोलनस्थळी दिवसभरात अनेक खासदार, आमदार यांनी भेट दिली. बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील खासदारांसह ओमराजे निंबाळकर यांचाही दौरा झाला. त्यांनी जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवला आणि मराठा आरक्षणासाठी आपली भूमिका स्पष्ट केली.

**आझाद मैदानात आंदोलकांची प्रचंड गर्दी**

मुंबई सीएसटी स्थानक व आझाद मैदान परिसरात सकाळपासूनच मराठा बांधवांची गर्दी पाहायला मिळाली. रेल्वे आणि खासगी वाहनांद्वारे हजारो आंदोलक मुंबईत दाखल झाले. न्यायालयाने घातलेल्या ५००० आंदोलकांच्या मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक लोक मैदानात आणि परिसरात उपस्थित असल्याचे चित्र दिसले. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली.

**पोलिसांकडून आंदोलनासाठी मुदतवाढ**

दरम्यान, पोलिसांनी आंदोलनासाठी आणखी एक दिवसाची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण व आंदोलन किमान उद्यापर्यंत चालणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा केवळ समाजभावनेचा प्रश्न न राहता पुन्हा एकदा राजकीय आंदोलनाचं रूप घेताना दिसतोय. जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात मोठा जनसमर्थन असल्यानं सरकारवर दबाव वाढतो आहे. भाजपसारख्या सत्ताधारी पक्षातील आमदाराने थेट विशेष अधिवेशनाची मागणी केल्यामुळे महायुती सरकारची कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकार या आंदोलनाला कशा प्रकारे प्रतिसाद देते, हे येत्या काही तासांत स्पष्ट होईल. मात्र सध्याच्या घडीला, आझाद मैदानावरून उठणारा आवाज राज्यातील पुढील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकणार, हे नक्की

## सोलर केबलची ...

गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल ताब्यात घेण्यात आला आहे. वायर किंमती १,४०,०००/- रुपयांचे जप्त केले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक, अजयकुमार बसंल, मा.अपर पोलीस अधीक्षक, आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी,रामेश्वर रेंगे. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक, एस.बी.भागवत, पोउपनी, पल्लेवाड, अंमलदार, अशोक गाढवे, गजानन राठोड, ज्ञानेश्वर वाघ, नरेंद्र चव्हाण, राम हाडे, विजय जाधव, गोविंद पवार, अच्युत चव्हाण, नितीन बोंडारे यांनी केलेली आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा ...

कर्जखाते (KCC ccounts) असून त्यापैकी केवळ ९% खाती विमा कवचाखाली आली आहेत. सर्व पात्र खात्यांचा समावेश ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत करावा.

मिशन शक्ती - महिला बचत गट (MSRLM² SHG) अंतर्गत बँकांनी चांगली कामगिरी केली असून पहिल्या तिमाहीत ३६% प्रगती साधली आहे. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने योजनांचा प्रसार व्हावा यासाठी यशोगाथा व योजनांची माहिती देणारे व्हिडिओ तयार करावेत, तसेच पोस्टर्स लावून जनजागृती करावी, असे निर्देश देण्यात आले. याशिवाय महामंडळाने बँकांचे ऑनलाईन पोर्टल विकसित करावे. बँकांना आर्थिक साक्षरता सल्लागारामार्फत (Financial Literacy Counsellor) किमान १०० गावांतील नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले. बँका, म्युच्युअल फंड्स इत्यादीमध्ये नागरिकांनी गुंतवणूक करून बचत व आर्थिक शिस्त वाढवावी, यासाठी जनजागृती करावी, असेही सांगितले.

# मेजर ध्यानचंद यांची जयंती क्रीडा दिन म्हणून साजरी



**जालना । प्रतिनिधी -** अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे आज मेजर ध्यानचंद यांची जयंती क्रीडा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी क्रीडा संचालक डॉ. भुजंगराव डावकर यांनी मेजर ध्यानचंद यांचे जीवन व कार्यवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी खेळातून खिलाडूवृत्ती जोपासत बौद्धिक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. पुढे बोलताना क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी खेळाला करिअरची संधी म्हणून बघावे असे आवाहन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, डॉ. कार्तिक गावंडे, डॉ. पंडित रानमाळ, डॉ. सीमा निकाळजे, प्रा. अविनाश भालेराव, डॉ. मसूद अन्सारी, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. बद्रीनाथ शिंदे, डॉ. अर्जुन जाधव, सुरेश चव्हाण, प्रा.चंद्रकांत लाटेकर, डॉ. शंकर तिकांडे यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जालना येथे फुटबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

जालना । प्रतिनिधी - देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात येतो. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी दरवर्षी २९ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. या निमित्ताने माय भारत जालना व ड्रिबल स्पोर्ट अक्ॅडमी यांच्या वतीने जालना शहरात फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

जुना जालना येथील पाठक मंगल कार्यालय (क्रिकेट टर्फ) येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धे पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले तसेच राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व पटवून सांगितले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रमाता अक्ॅडमीचे अनिलकुमार धारे उपस्थित होते. तसेच रेल्वे पश्चिम विभागाचे फुटबॉल प्रशिक्षक सदानंद निर्मल, ड्रिबल स्पोर्ट अक्ॅडमीचे अध्यक्ष जयपाल राठोड, पंकज बागल, जालना जिल्हा फुटबॉल अक्ॅडमीचे अध्यक्ष इस्माईल शेख, फुटबॉल क्षेत्रातील प्रशिक्षक रियाज शेख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अनिलकुमार धारे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, क्रीडा ही केवळ शारीरिक तंदुरुस्ती साठीच नसून मानसिक विकासासाठी देखील तितकीच महत्त्वाची आहे. स्पर्धा जिंकणे-हरणे गौण असून खेळामध्ये सहभाग घेणे हेच खरे यश आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा संस्कार आत्मसात करण्याचे आवाहन केले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी देखील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



स्पर्धेत दोन संघांनी सहभाग घेतला. सामन्यात आर अक्ॅडमीने विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर द्वितीय क्रमांक हुद्दा उर्दू शाळेने पटकावला. विजेत्या व उपविजेत्या संघातील खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार ड्रिबल स्पोर्ट अक्ॅडमीचे अध्यक्ष जयपाल राठोड यांनी केले. त्यांनी माय भारत जालना तसेच सर्व मान्यवर, खेळाडू व प्रेक्षकांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले. या फुटबॉल स्पर्धेमुळे जालना शहरात राष्ट्रीय क्रीडा दिनाला एक नवा उत्साह लाभला. युवकांमध्ये फुटबॉलबद्दलची आवड वाढविण्यासाठी अशा स्पर्धा दरवर्षी मोठ्या प्रमाणावर घ्याव्यात, अशी मागणी क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात श्री. गणेश उत्सव, ईद ए मिलाद या सण, उत्सव आणि इतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.२९ ऑगस्ट २०२५ ते ११ सप्टेंबर पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

## आजचे राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी ऊर्जा आणि उत्साहाने भरलेला असेल. कामाच्या ठिकाणी तुमचे नेतृत्वगुण दिसून येतील आणि तुमच्या कामाचे कौतुक होईल. आर्थिक बाबतीत लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल, ज्यामुळे मन प्रसन्न राहील.

**वृषभ :** आज तुम्हाला काही अडथळ्यांचा सामना करावा लागू शकतो. संयम ठेवा आणि कोणताही महत्त्वाचा निर्णय घाईत घेऊ नका. आर्थिक खर्च वाढू शकतो, त्यामुळे अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. संध्याकाळपर्यंत परिस्थिती सुधारेल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला आहे. तुमच्या कल्पनांना योग्य दिशा मिळेल आणि रखडलेली कामे पूर्ण होतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. प्रेमसंबंधात गोडवा येईल. आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क :** आज तुम्हाला मानसिक शांतता मिळेल. तुम्ही घेतलेल्या निर्णयामुळे फायदा होईल. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. कुटुंबातील सदस्यांसोबतचे संबंध अधिक दृढ होतील. आर्थिक गुंतवणूक फायदेशीर ठरू शकते.

**सिंह :** आज तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित कराल. तुमच्या मेहनतीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. नवीन लोकांशी ओळख होईल, ज्यामुळे भविष्यात फायदा होईल. आरोग्याच्या दृष्टीने दिवस उत्तम आहे.

**कन्या :** आज तुम्हाला थोडे सावध राहावे लागेल. महत्त्वाचे निर्णय घेताना विचारपूर्वक घ्या. कोणाशीही वाद घालू नका. आर्थिक बाबतीत खर्च वाढू शकतो. ध्यान आणि योग केल्याने मानसिक ताण कमी होईल.

**तूळ :** आज तुमच्या कामात यश मिळेल. तुमचे धैर्य आणि आत्मविश्वास तुम्हाला प्रत्येक समस्येतून बाहेर काढेल. अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील व्यक्ती तुम्हाला सहकार्य करतील.

**वृश्चिक :** आज तुम्हाला काही आव्हानांना सामोरे जावे लागेल, परंतु तुम्ही तुमच्या कौशल्याने त्यांवर मात कराल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामाचे कौतुक होईल. जोडीदारासोबतचे संबंध चांगले राहतील.

**धनु :** आज तुमच्या कामाला गती मिळेल. तुमचे प्रयत्न यशस्वी होतील. नवीन संधींचा शोध घ्या, कारण त्यामुळे तुमच्या करिअरमध्ये प्रगती होईल. कुटुंबातील सदस्यांसोबत आनंदाचे क्षण अनुभवाल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. तुमचे आरोग्य चांगले राहील. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक गुंतवणुकीतून फायदा होण्याची शक्यता आहे. अचानक प्रवासाचा योग आहे.

**कुंभ :** आज तुम्हाला काही नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्याची संधी मिळेल. तुमच्या कामाच्या क्षमतेची परीक्षा होईल. कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल. अचानक प्रवास घडण्याची शक्यता आहे.

**मीन :** आज तुम्ही थोडे भावूक होऊ शकता. कोणताही निर्णय घेताना भावनिक होऊन घेऊ नका. कामाच्या ठिकाणी शांत राहा. आर्थिक बाबतीत काळजीपूर्वक व्यवहार करा. ध्यान आणि योग केल्यास मानसिक शांती मिळेल.

**टीप:** हे सामान्य राशी भविष्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कुंडलीनुसार त्यात बदल होऊ शकतो. अधिक माहितीसाठी तुम्ही ज्योतिषाचा सल्ला घेऊ शकता.

# गाढेगव्हाण शिवारात कार विहिरीत पडून पाच जणांचा मृत्यू

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी ते राजुर रस्त्यावर आज शुक्रवार रोजी पहाटे अंदाजे पाच वाजता गाढेगव्हाण परिसरातील मॉर्निंग वाकला गेलेल्या नागरीकाला धडक देऊन पळून जाण्याच्या तयारीत असलेली चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असणाऱ्या विहिरीत जावून पडली होती.

जालना जिल्ह्यातील अपघाताची माहिती समजताच या घटनेचे गांभिर्य ओळखून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत अपघातग्रस्त ठिकाणी तातडीने अचुक व समन्वय ठेवून बचाव व मदत कार्य करण्यात आले.

सकाळपासून उपविभागीय अधिकारी डॉ.बी.सर्वाणंन,अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी,उपविभागीय पोलिस अधिकारी नितिन कटेकर,तहसीलदार मिसाळ,अग्निशमन अधिकारी माधव पाणपट्टे हे घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर झाले होते. टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे भारती साहेब, खाडे साहेब, त्यांची संपूर्ण टीम तसेच, हसनाबाद पोलीस स्टेशनची संपूर्ण टीम, गावकरी, हे सर्वजण मदत कार्यामध्ये पुढे होते. जिल्हा प्रशासनाकडून शर्थीचे प्रयत्न करत क्रेनच्या सहाय्याने दुर्घटनाग्रस्त कार विहीरीतुन बाहेर काढण्यात आली. तसेच या अपघातात मृत्यु पावलेल्या व्यक्तीमध्ये ३ पुरुष



आणि २ महिलांचा समावेश असून एकुण ५ मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. विहीरीतील मृतदेह शोधण्यासाठी गोताखोर यांनी तळाशी जावून शोध घेतला. पोलिस विभागाकडून अधिक तपास करण्यात येत आहे. अशी माहिती मिळाली आहे.

दरम्यान,संभाजीनगर फुलंब्री तालुक्यातील गुंगी गेवराई येथून जाफराबाद मार्गे मेहकर तालुक्यातील सुलतानपूर कडे डकले परिवारातील पाच जण जात होते त्यामध्ये ज्ञानेश्वर भाऊसाहेब डकले,निर्मला सोपान डकले (रा.गुंगी गेवराई),पद्माबाई लक्ष्मण भामीरे,ज्ञानेश्वर लक्ष्मण भामीरे (रा. कोपर्डा ता.भोकरदन) आणि वाहनचालक अशा पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यावेळी सकाळी गाडेगव्हाण येथील माजी सरपंच भगवान बनकर व त्यांचे सहकारी रोडवर फिरत असताना गाडीने त्यांनी धडक दिली आणि चारचाकी जवळच्या विहिरीत कोसळली. कारच्या धडकेत बनकर गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जालना येथील कलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ही घटना घडतात परत एकदा जालना जिल्ह्यामध्ये पूर्वी घडलेल्या लगतच्या अपघाताची जाणीव झाली असून, जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील रोड लगतच्या विहिरीचा सर्वेक्षण करून त्या कायमच्या बंद केल्या पाहिजे ही मागणी जोर धरत असून अपघाताला या विहिरी कारणीभूत ठरत असल्याचे निदर्शनास येत आहे.

## जालना गणेश फेस्टिवल तर्फे त्रैभाषिक मुशायरा-कवी संमेलन

**जालना । प्रतिनिधी -** जालना गणेश फेस्टिवल २०२५ या सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २ वाजता श्री कल्याणराव घोगरे क्रीडा संकुल, जुना जालना येथे भव्य त्रैभाषिक मुशायरा व कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक मा. रामराव रिंढे भूषविणार असून हिंदी, उर्दू व मराठी अशा तिन्ही भाषांतील नामवंत कवी या संमेलनात सहभागी होणार आहेत.

हिंदी कवी : मा. कमल किशोर शर्मा, डॉ. सलीम नवाज हशर, अब्दुल रज्जाक रहबर, शिवकुमार बैजल

उर्दू कवी : आरिफ भाई, डॉ. रिहान दानिश, अब्दुल हसीब फतहान, हाफिज अनिस, नाजीम खान (सेवली), अब्दुल रहीम, जोहर हुसेन ताहेर, परवेज आलम, नईम खान नईम

मराठी कवी : रेखा बैजल, डॉ. संजीवनी तडेगावकर, सुनील लोणकर, गोविंदप्रसाद मुंदडा, कविता बोरगावकर, राजाराम जाधव, भीमराव सपकाळ, किशोर ज-हाड, प्रदीप इक्कर, कल्याणी देशमुख, रमाकांत कुलकर्णी, विठ्ठल काष्टे, सुरेश कायटे, शंकर कपाळे, प्रकाश कुंडलकर, पंडित वराडे, श्रीकांत गायकवाड, विनायक काळे, माधवी चव्हाण, गोवर्धन मुळक, वसंत कोलते, उत्तमराव शेजवळ, विद्या दिवटे, जगन्नाथ काकडे, सत्यशिला तौर, कैलास भाले, शिवाजी कायंदे, डॉ. प्रभाकर शेळके, डॉ. सुहास सदाव्रते, डॉ. शशिकांत पाटील, राम गायकवाड, प्रा. अशोक खेडकर, मनीष पाटील, रत्नमाला मोहिते, रेखा गतखणे, शिवाजी तेलंगे, डॉ. दिगंबर दाते, विनोद जैतमहाल, सुहास पोतदार, डॉ. एकनाथ शिंदे, साहिल पाटील, दिनेश शेळके, विनोद काळे, छाया वाघ, गणेश खरात, डॉ. राज रणधीर, मनीषा गायकवाड, लक्ष्मीकांत दाभाडकर, प्रा. शोभना भालेराव, जिजा वाघ, कृष्णा कदम, आबासाहेब म्हस्के, किशोर भालेराव, वैशाली फुके, समाधान खाडे आदी अनेक कवी आपली कविता सादर करणार आहेत.

या मुशायरा-कवी संमेलनाचे सुत्रसंचालन प्रा. पंढरीनाथ सारके करतील. या अनोख्या साहित्यिक मेजवानीत जालना व परिसरातील रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील, अध्यक्ष २०२५ अशोकराव आगलावे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब घुगे, सतीश पंच व संयोजन समिती यांनी केले आहे.



## नागरिकांनी मोफत उपचारासाठी आयुष्यमान कार्ड तयार करुन घ्यावे

### गजानन जोशी यांचे आवाहन

**नांदेड -** महाराष्ट्रात जिल्ह्या-जिल्ह्यात सध्या आयुष्यमान कार्ड निर्मिती मोहिम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत देवाभाऊ फाऊंडेशन संघटनेतर्फे लोकसभा,विधानसभा समन्वयक व प्रमुख कार्यकर्ते मिळून नागरिकांना आवाहन करत आयुष्यमान कार्ड काढून देण्यासाठी प्रयत्नशील राहतील.

नागरिकांचे आयुष्यमान कार्ड तयार करण्यासाठी देवाभाऊ फाऊंडेशनचे सर्व कार्यकर्ते सज्ज असतील,तसेच वय ७० हुन अधिक असणाऱ्या नागरिकांसाठी विशेष कॅम्प आयोजन करत एक वेगळा आदर्श ठेवला जाणार आहे. गरजू व आजारी लाभार्थ्यांना मोफत उपचाराचा लाभ मिळावा,अशी भावना देवाभाऊ फाऊंडेशन संस्थापक गजानन जोशी यांनी व्यक्त केली.

या योजनेत पात्र लाभार्थ्यांना शासकीय मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळण्याची सुविधा आहे. विशेष म्हणजे गंभीर आजारांवर ३४ विशेष श्रेणींमध्ये १ हजार ३५६ शस्त्रक्रिया व उपचारांचा समावेश असून,सांधे प्रत्यारोपण,लहान मुलांचे कर्करोग उपचार,मानसिक आजारांवरील उपचार यांचा देखील समावेश आहे...

हा फक्त शासकीय उपक्रम नाही,तर समाजातील प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. राज्यातील समाजसेवक,विद्यार्थी,ग्रामपंचायत प्रतिनिधी,स्वयंसेवी संस्था यांनी या विशेष मोहिमेत सहभागी होऊन आपल्या परिसरातील प्रत्येक पात्र लाभार्थ्याचे कार्ड तयार करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.असेही आवाहन देवाभाऊ फाऊंडेशन संस्थापक श्री.गजानन जोशी यांनी केले.

## संतांचे कार्य समाजाला दिशा देण्याचे - ह.भ.प.आप्पासाहेब महाराज मुळे

**विशाल देशमुख**

**टेभूर्णी -** श्री संत गजानन महाराज तथा श्री महाकालेश्वर भगवान यांच्या प्राणप्रतिष्ठा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने सोनल नगर जालना येथे ऋषीपंचमीच्या पावन पवित्र मुहूर्तावर सकाळी श्री संत गजानन महाराज व श्री महाकालेश्वर भगवान यांचा रुद्र अभिषेक व पूजन करण्यात आले त्यानंतर सकाळी सुंदर अशा शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले यामध्ये सर्वात पुढे वारकरी ध्वज,विणेकरी टाळकरी मंडळी, रथामधे श्री गजानन महाराज व श्री महाकालेश्वर भगवान यांच्या प्रतिमा त्यामागे कॉलनीतील सर्व महिला, पुरुष ,लहान,थोर तसेच परिसरातील भाविक भक्त या सर्वांनी अगदी टाळ विण्याच्या तालावर ज्ञानोबा तुकोबांचा जय घोष करत संपूर्ण परिसर उत्साहात न्हाऊन निघाला होता,प्रत्येक घरासमोर सडा,रांगोळी काढून सुंदर सजावट कॉलनीतील महिला भगिनींनी केली होती शोभायात्रा समारोप पुन्हा मंदिरात येऊन महाआरतीने करण्यात आला. व त्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले यामध्ये जवळ जवळ दोन हजार भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

रात्री ९ ते ११ या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प आप्पासाहेब महाराज मुळे यांचे हरीकिर्तन झाले.संतांचिये पायी हा माझा विश्वास, सर्व भावे दास झालो त्यांचा , तेचि माझे हित करिती सकळ, जेणे हा गोपाळ कृपा करी, भागलिया मज वाहतील कडीये ,ज्यांचियानेजोडे सर्वसुख,तुका म्हणे शेष घेईन आवडी,वचन न मोडी बोलिले ते या अभंगावर विस्तृत असं निरुपण महाराजांनी केलं. या भूतलावरील प्रत्येक मनुष्य जन्माला येतो आणि त्याला जर आपल्या जीवनाचा उद्धार करायचा असेल तर त्याला संतांच्या संगतीत राहावे लागेल,त्यांच्यावर विश्वास ठेवून त्याचं दास्यत्व स्वीकारावं लागेल,आपण जर तस केलं तर आपल्याला काय फायदा होईल? कारण आता जग हे फायद्याच्या मागे आहे , सर्व जग पैशांच्या मागे धावत आहेत, पैसा जीवनात जरूर कमवा , पैसे कमवू नका या मताचा मी नाही पण जोडूनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी, या उक्तीप्रमाणे आपण धन कमवाव ते तुम्हाला प्रपंचात, संसारात उपयोगी पडेल पण निव्वळ धन धन करून चुकीच्या मार्गाने आपण भरकटू नये यासाठी आपल्याला संत योग्य वाट दाखवण्याचं अर्थात परमार्थाची वाट दाखवण्याचं काम करतात म्हणून आपण त्यांच्यावर विश्वास ठेवावा कारण त्यानेच आपलं हित होणार आहे.जीवनात आपल्याला खरा संत ओळखताही आला पाहिजे कारण सध्या खऱ्या साधूला भोंदू आणि भोंदूला साधू लोकं समजू लागले आहेत. खरा संत तोच आहे ज्यांच्या अंगी दया,क्षमा शांती आहे त्यांची संगत धरा त्याने तुमच्यावर भगवंत कृपा झाल्याशिवाय राहणार नाही अस महाराज या वेळी म्हणाले.

सध्या समाजात विश्वास कोणावर ठेवावा हा मोठा प्रश्न, ज्याच्यावर विश्वास ठेवावा तो विश्वासघात करण्याचे अनेक प्रकार या ठिकाणी करत आहे अशावेळी आपण आपल्या सत्संग बुद्धीने खऱ्या संतावर विश्वास ठेवावा त्यामुळे आपल्या जीवनात तेच आपल्याला या जीवनरुपी महासागरात पैलतीर पोहचविण्यासाठी मदत करतील. आपण प्रपंचात राहून परमार्थ करावा ज्याचं जे काम असेल ते त्याने प्रमाणिकपणे करावं कर्म सोडू नये




कर्माचा त्याग करू नये पण कर्मात त्याग करावाअसं महाराज या वेळी म्हणाले.कीर्तनासाठी मृदंग साथ ह भ प विठ्ठल महाराज काळे तसेच गायन साथ ह भ प भागवत महाराज नागवे, ह भ प राजू महाराज गव्हाणे यांनी दिली यावेळी श्री संत गजानन महाराज संस्थानचे सर्व विश्वस्त व सेवेकरी भक्त तसेच कॉलनीतील महिला पुरुष यांनी कीर्तन सेवेचा लाभ घेतला.

## जिल्हा प्रशासनाकडून तातडीने मदत कार्य

**जालना -** जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी ते राजुर रस्त्यावर शुक्रवार दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे अंदाजे ५ वाजता चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक कार रस्त्याच्या कडेला असणाऱ्या विहिरीत जावून पडली होती. जालना जिल्ह्यातील अपघाताची माहिती समजताच या घटनेचे गांभिर्य ओळखून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत अपघातग्रस्त ठिकाणी तातडीने अचुक व समन्वय ठेवून बचाव व मदत कार्य करण्यात आले. सकाळपासून उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी डॉ.बी. सर्वांनन, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलिस अधिकारी नितिन कटेकर, प्र.तहसीलदार सुरेश मिसाळ, अग्निशमन अधिकारी माधव पाणपट्टे हे घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर झाले होते. जिल्हा प्रशासनाकडून शर्थीचे प्रयत्न करत क्रेनच्या सहाय्याने दुर्घटनाग्रस्त कार विहीरीतुन बाहेर काढण्यात आली. तसेच या अपघातात मृत्यु पावलेल्या व्यक्तीमध्ये ३ पुरुष आणि २ महिलांचा समावेश असून एकुण ५ मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.